संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३६९६/२०२३
निशाणी नं.१०.

**फिर्यादी यांचा पुढील सरतपास शपथेवर वकील श्रीमती निशा उघडे, यांचेमार्फत-**

४६. मी नि.क्र.१० कडे माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

४७. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.१ कडे आरोपीने मला दि.१८.०७.२०२३ रोजी दिलेला धनादेश क्र.३३२०७० रक्कम रुपये १,८२,०००/- ची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.११ देण्यात येते.

४८. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.२ कडे वादातील धनादेश वटणेकरीता माझी बॅक कोंटक महिंद्रा शाखा खराडी पुणे यांचेकडे दि.१८.०७.२०२३ रोजी भरल्याच्या स्लीपची मुळ प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.१२ देण्यात येते.

४९. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.३ कडे वादातील धनादेश अपुरा निधी या करणाने न वटता परत आल्याचा दि.२०.०७.२०२३ च्या मेमोची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर बॅकेच्या अधिका-यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.१३ देण्यात येते.

५०. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.४ कडे वादातील धनादेश मी पुन्हा बॅकेत भरला व तो अपुरा निधी या कारणाने न वटता परत आल्याच्या दि.१८.०८.२०२३ च्या मेमोची मुळ प्रत दाखल केली आहे. तयावर बॅकेच्या अअधिका-यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला निक्र.१४ देण्यात येते.

५१. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.५ कडे वादातील धनादेश वटणेकरीता माझी बॅक कोंटक महिंद्रा शाखा फातिमानगर पुणे यांचेकडे दि.२०.०९.२०२३ रोजी भरल्याच्या स्लीपची मुळ प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.१५ देण्यात येते.

५२. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.६ कडे वादातील धनादेश अपुरा निधी या करणाने न वटता परत आल्याचा दि.२२.०९.२०२३ च्या मेमोची मुळ प्रत दाखल केली आहे.

त्यावर बॅंकेच्या अधिका-यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.१६ देण्यात येते.

५३. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.७ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.१६.१०.२०२३ रोजी पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.१७ देण्यात येते.

५४. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.८ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.१६.१०.२०२३ रोजी पाठविलेल्या नोटीसीची पोस्टाच्या पावतीची मुळ प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.१८ देण्यात येते.

५५. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.९ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.१६.१०.२०२३ रोजी खोपोलीच्या पत्यावर पाठविलेल्या नोटीसीची पोस्टाच्या पावतीची मुळ प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.१९ देण्यात येते.

५६. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.१० कडे नोटीस आरोपीने न स्वीकारल्यामुळे परत आलेला पोस्टाच्या लिफाफ्याची मुळ प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.२० देण्यात येते.

५७. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.११ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.१६.१०.२०२३ रोजी कामशेतच्या पत्यावर पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.२१ देण्यात येते.

५८. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.१३ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.२१.१०.२०२३ रोजी कामशेतच्या पत्यावर दुस-यांदा पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी व माझ्या

वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.२२ देण्यात येते.

५९. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.१४ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.२१.१०.२०२३ रोजी खोपोली पत्यावर पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.२३ देण्यात येते.

६०. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.१५ कडे आरोपीने नोटीस न स्वाकारल्यामुळे पोस्टाचा परत आलेल्या लिफाफ्याची मुळ प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.२४ देण्यात येते.

६१. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.१६ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.२१.१०.२०२३ रोजी कामशेत पत्यावर दुस-यांदा पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.२५ देण्यात येते.

६२. मी कागदयादी नि.क्र.०३ अनुक्र.१७ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्यामुळे माझे वकीलांमार्फत आरोपीला दि.२१.१०.२०२३ रोजी कामशेतच्या पत्यावर पाठविलेल्या नोटीसीची पोस्टाच्या पावतीची मुळ प्रत दाखल केली आहे. त्याला नि.क्र.२६ देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.</u>**

वरील जबाब साक्षीदारास वाचुन दाखवला. तो त्यांनी त्यांच्या सांगणेप्रमाणे नमुद केल्याचे कथन केले.

स्थळ : पुणे.
दिनांक : २३/०४/२०२५.

सही/-
(अमित अ.कुलकर्णी)
२ रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

**उलटतपास नि. २७ कडील आदेशानुसार फिर्यादीचा उलटतपास वकील श्री. एम.टी.पोखरकर यांचेमार्फत.**

६३. हे म्हणणे खरे नाही की, फिया्रदीच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद मी आरोपीच्या मोबाईल क्रमांकावर रु. ९०,०००/- पाठविल्याचे खोटे नमूद केले आहे. मी आरोपीच्या फोन पे असलेल्या मोबाईल क्रमांकावर सदर पैसे पाठविले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १७, २१ व २५ कडील नोटीसींमध्ये आरोपीला रु. ९०,०००/- मदत म्हणून दिल्याचे नमूद केले आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की मी ते पैसे मदत व वैयक्तिक वापरासाठी दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १७, २१ व २५ कडील नोटीसींमध्ये आरोपीला हातउसने म्हणून पैसे दिल्याचे नमूद नाही. माझ्याकडे खाजगी सावकारी संदर्भातील परवाना नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे फिर्यादी आरोपीला हातउसने पैसे दिल्याचे खोटे नमूद केले आह हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ११ कडील धनादेशावर असलेले हस्ताक्षर माझे आहे. माझ्या पतीला आरोपीने तीन धनादेश दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ११ कडील धनादेश कोरा होता. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ११ कडील धनादेश आरोपीने हमी म्हणून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी धनादेशावर खोटी रक्कम नमूद करुन तो धनादेश अनादरीत करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ११ मध्ये असलेली नमूद रक्कम आरोपी मला देईल असा भरोसा त्याने मला कधी दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझेसमोर फ्रॅन्चायजी घेण्यासाठी कोणताही प्रस्ताव मांडला नव्हता. आरोपीने फ्रॅन्चायजी घेण्यासाठी कधी प्रस्ताव मांडला होता त्याची नेमकी तारीख फिर्यादीत नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, फ्रॅन्चायजी घेण्यासाठी रु. १,८२,०००/- आवश्यक आहेत असे आरोपीने मला कधीही सांगीतले नव्हते. आरोपीने फ्रॅन्चायजीचा प्रस्ताव ठेवला याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. साक्षीदार सांगते की समोरासमोर बोलणे झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फ्रॅन्चायजीकरीता कधीही ९०,०००/- दिले नव्हते व ते ९०,०००/- रुपये आरोपी मला देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते रु. ९०,०००/- फ्रॅन्चायजी करीता वळते करण्यासाठी स्वीकृती व संमती आरोपीने माल कधीही दिली नव्हती. आरोपीने मला स्वीकृती व संमती मला तोंडी स्वरुपात दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला रु. ९२,०००/- कधीही रोख स्वरुपात दिले नव्हते. माझ्याकडे व आरोपीकडे जी-पे असतांना देखील आरोपीला रोख स्वरुपात पैसे का दिले त्याचे कारण मला सांगत येईल. माझ्याकडे सेव्हींग होती म्हणून आरोपीला रोख स्वरुपात पैसे दिले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला रु. ९२,०००/- रोख स्वरुपात कधी दिले ती तारीख फिर्यादीत नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला रु. ९२,०००/- रोख स्वरुपात दिल्याची पोहोच अगर पावती माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, फ्रॅन्चायजीची संपूर्ण रक्कम रु. १,८२,०००/- होती असे दर्शविणारा कागद माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपीमध्ये फ्रॅन्चायजीचे संदर्भाने कोणताही कागद अगर दस्तएवज झालेला नाही. मी संबंधीत फ्रॅन्चायजीची धारक होते. हे म्हणणे खरे नाही की, रोख स्वरुपात मी आरोपीला

कधीही व कोणतीही रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वैयक्तिक गरजा भागविण्यासाठी मी आरोपीला रु. १,८२,०००/- पैकी किती रक्कम दिली व व्यवसायासाठी किती दिली त्याचा स्वतंत्र तपशिल फिर्यादीमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला सुरुवातील रु. ५००० इतकी रक्कम कधीही दिलेली नव्हती. रु. ५००० इतकी रक्कम मी आरोपीला मोबाईल क्रमांकावर पाठविली होती. मी त्यासंदर्भात बँकेचा खातेउतारा याकामी दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या बँक खातेउताऱ्यावर बॅकेच्या अधिकाऱ्यांची सही व बँकेचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये फिर्याद परिच्छेद क्र. ६ मध्ये मी कर्ज काढल्याचे खोटे नमूद केले आहे. मी किती रुपयाचे कर्ज काढले त्याचा तपशिल फिर्यादीत नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कर्ज काढलेच नाही. मी बँकेतून कर्ज काढलेले नाही. मी कर्ज कधी काढले ती तारीख फिर्यादीत नमूद नाही.हे म्हणणे खरे नाही की, रु. ९२,०००/- देण्याची माझी कधीही आर्थिक कुवत नव्हती. मी आयकर परतावा भरत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५.०१.२०२३ रोजी फ्रॅन्चायजी सुरु केल्याचे मी खोटे सांगत आहे. दि. १५.०१.२०२३ रोजी फ्रॅन्चायजी सुरु केली याचा दस्ताएवज माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, दोन महिने फ्रॅन्यायजी मी चालविल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या फ्रॅन्चायजी द्वारे मी ग्राहकांना पिझ्ज़ा व खाद्य पदार्थ विक्री केल्याचे खोटे सांगत आहे. मी व आरोपीमध्ये व्यवसायासाठी अटि व शर्ती तोंडी ठरल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रु.१,८२,०००/- ही फ्रॅन्चायजीच्या डिपॉझीटजी रक्कम असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी परिच्छेद क. ९ मध्ये जो पत्ता दिला आहे त्याचे भाडेकरारपत्र माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की,खाद्य पदार्थ विक्रिसाठी आवश्यक असणारा परवाना तसेच शॉप अॅक्ट परवाना माझ्याकडे नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, विवादीत फ्रॅन्चायजीची फी रु. १,८२,०००/- होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहहे की फिर्यादीमध्ये प्रशिक्षण फी, सपोर्ट सिस्टीम फी व लायसन्स व परमिट फी याचा तपशिल नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहेक की, फिर्याद परिच्छेद क्र. ९ मध्ये व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल, मॅन पावर व्यवस्थापन व व्यवसाय वृध्दीसाठी जाहीरात याच्या खर्चासाठीचा तपशिल नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझा कोणत्याही प्रकारचा व्यवसाय बंद पाडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व्यवसाय सुरुच केलेला नव्हता. आरोपीने माझ्या मोबाईल क्रमांकावर दि. ०२.०१.२०२३ रोजी रु. ३१८ व दि. २५.०१.२०२३ रोजी रु. ५०० पाठविले होते याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मार्च २०२३ मध्ये आरोपीने माझ्या स्टेट बँकेच्या खत्यावर रु. ४९,५०० इतकी रक्कम पाठविली होती. जुलै २०२२ पासून आरोपीने मझ्या पतीला रक्कम रु. १,०६,०३२/- इतकी रक्कम दिलेली आहे अगर कसे ते मला पहावे लागेल. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीच्या खोपोली येथील दुकानातील काही साहित्य जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, नोटीसीबाबतचा ट्रक रिपोर्ट मी खोटा दाखल केला आहे.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

स्थळ : पुणे.
दिनांक : १८/०९/२०२५.

सहि/-
(अमित अ.कुलकर्णी)
३ रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.